<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

<u>(दिनांक 28.02.2017 ची सर्वानुमते तहकुब करण्यात आलेली)</u>

दिनांक. 17.03.2017 रोजी दुपारी 03.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकिय विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. देशमुख मंगला गजानन, सभापती**

<u>सर्वश्री</u>

| | |
|---|---|
| तेहरा अनुजा अमितसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| जकीया बेगम स. मुखतार | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| स. जानी म. कासीम | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| जाधव जयश्री आनंद | |

**सभापती** — उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, प्रभारी आयुक्त तथा उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, प्राधिकृत अधिकारी तथा उपआयुक्त (महसुल) तथा मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवाड, मुख्य लेखा परिक्षक श्री आर. एस. कोलगणे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन अंदाजपत्रकिय विशेष सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**सभापती** — अर्थसंकल्पीय तहकुब केलेली सभा सुरु करण्यात येते.

**अनुजा तेहरा** — मालमता कराची वसुली अत्यंत चांगली चालु आहे. वसुली चांगली असल्याने उपआयुक्त महसुल व वसुली विभागाच्या सर्व कर्मचा-यांच्या अभिनंदन करण्यात येते.

**प्राधिकृत अधिकारी** — मनपाच्या हददीतील नांदेड शहराची लोकसंख्या 6.50 लक्ष आहे. शहरातील मालमतेची संख्या ही अंदाजे एक लाख दहा हजार आहेत. मालमत्तेच्या संख्येत रुम मध्ये वाढ झालेली आहेत.

**अनुजा तेहरा** — मला तरी वाढत नाही की टॅक्समध्ये कोणत्याही प्रकारचा वाढ करावी. तसेच कंत्राटी डॉक्टराचे मानधन आयुक्त साहेबांनी वाढवले. त्याच प्रमाणे आपल्या कंत्राटी इंजीनिअर यांच्या पगारात वाढ करण्यात यावी.

**प्राधिकृत अधिकारी** — बजेटमध्ये सर्व कंत्राटी कर्मचारी यांचे मानधन वाढ करण्याबाबत तरतुद करावी. त्याप्रमाणे प्रशासन त्याची अंमलबजावणी करेल.

**अनुजा तेहरा** — व्यवसाय परवान्याबाबत सुध्दा कार्यवाही करावी.

**प्राधिकृत अधिकारी** — मनपा हददीत 15 ते 16 हजार लहान मोठे दुकाने असतील केवळ 4000 दुकानाचा नोंदनी केलेली आहे.

**अनुजा तेहरा** — स्वेच्छा निधी 30 लक्ष ठेवला होता तो स्वेच्छा निधीत 10 लक्ष रुपयाची वाढ करुन तो 40 लक्ष करण्यात यावा.

**उमेश चव्हाण** — प्रत्येक प्रभागासाठी 80 लाख रुपये ठेवण्यात यावे. जे बीएसयुपीचे घर आहेत त्या केवळ 8 हजार घराना टॅक्स लावण्यात येत आहे. उर्वरीत बिएसयुपीच्या घरांना टॅक्स लावण्यात आलेला नाही. त्या लोकांना घर नंबर देण्यात यावा. त्यांच्याकडून टॅक्स वसुली करुन घ्यावा.यामुळे मनपाचे उत्पन्नात वाढ होईल. केवळ आपण 80 हजार लोकांचा आपण टॅक्स वसुल करतो इतर 35 हजार लोकांचा आपण टॅक्स घेत नाही.

**अनुजा तेहरा** — श्याम टॉकीज व गणेश टॉकीजला जो टॅक्स लावला आहे. तो त्यांना टॅक्स का वेगवेगळा का लावण्यात आला आहे. त्याचे व्हेरी फाय करुन घेण्यात यावे.

**प्राधिकृत अधिकारी** — दोन्ही ठिकाणचा रेडी रेक्नर वेगळा आहे. त्यामुळे टॅक्स वेगळा लागला असेल जर मेजर मेंटमध्ये चुका असतील तर त्या सुधारता येतील. या दोन्ही टॉकीजच्या संचिका काढण्यात याव्यात त्याुनसार तपासनी करुन घेण्यात येईल. चुक असल्यास सुधारणा करण्यात येईल.

**अनुजा तेहरा** — गुरुव्दारा एरीयामध्ये नळ जोडणीची बोगस मागणी बिले गेली आहेत. ती बिले गेली असल्यास ती देखील तपासुन घेण्यात यावे. तसेच मनपामार्फत दि. 8.3.2017 रोजीच्या महीला दिना निमीत्त दिनांक 17.2.2017 रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.त्या कार्यक्रमाची मला अदयापपर्यंत कार्यक्रमाची पत्रीका प्राप्त झालेली नाही मी माजी सभापती ( स्थायी समिती) असुन सध्या स्थायी समिती सदस्य देखील आहे. मला कार्यक्रमाची पत्रीका का पाठवण्यात आली नाही. मी

या कार्यक्रमाची तयारी चांगली केली होती. मला आजपर्यंत पत्रीका मिळालेली नाही मला जानिव पुर्वक पत्रीका न देण्याचे ठरविण्यात आले आहे की काय याचा खुलासा प्रशासनाने करावा. महिलाच महीलांना मागे ओढत असतात हे योग्य नाही. वाटप करणारा कोण आहे त्यांना बोलवण्यात यावे.

**प्राधिकृत अधिकारी** आज सांयकाळी कार्यक्रम आहे आपणास स्टॅंडींग निमत्रण आहे या कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**स.जानी म. कासीम** आपण जी टॅक्स वसुली करत आहोत ती अगदी चांगली आहे. मला ही टॅक्स वसुली करीत असताना महीण्याच्या शेवटी लोकाकडे जाणे चुक आहे. जर एमएसईबी सारखे आपण दर महीण्याला वसुलीला नागरीकाकडे गेले पाहिजे. जर नागरीकाकडे दर महीण्या गेले तर त्यांना त्रास होणार नाही. पण शेवटी एकदाच वसुलीसाठी जातो. त्यामुळे त्या नागरीकांना त्रास होवू शकतो. ते मग आमच्याकडे येतात आणि त्यांना आपण थोडी फार टॅक्स भरण्यास सुट दिली पाहिजे. जो आम्हाला बजेटमध्ये वार्ड विकास निधी ठेवण्यात येतो त्या वार्ड विकास निधीच जास्त खर्च त्वरीत करण्यात यावा.अशी मी प्रशासनास विनंती करतो. मी 80 लक्षाचा निधी ठेवण्यात आला आहे. तो ठेवलेला निधी खर्च करण्यात यावा. खडकपुरा साईडकडे इदगाईसाठी बजेट देण्यात यावे. यावर्षीच्या बजेटमध्ये देखील 1 कोटी 5 लक्ष बजेटमध्ये तरतुद ठेवण्यात यावी. ईदगाहच्या ठिकाणची कामे करुन घ्यावे.

**तुलजेस यादव** गुंठेवारीचा एक उत्पन्नवाढीचा विषय आहे. गुंठेवारी चालु आहे. चालू नसल्यास ती गुंठेवारी चालू करण्यात यावी.

**प्राधिकृत अधिकारी** गुंठवारीमध्ये सर्वसाधारण सभेने ठराव घेतला आहे. 2001 पुर्वीचे असलेले प्लॉट यामध्ये समावेश आहे. गुंठेवारी मध्ये ज्या लोकांनी रेग्युलर करुन घेतले नाही त्यांच्यावर कडक कार्यवाही केली पाहिजे.

**तुलजेस यादव** ज्या नागरीकांनी बांधकाम परवानगी घेतली असले तर त्यांनी बांधकाम जास्तीचे केले अशा मालमत्ता धारकांनी जास्तीचे बांधकाम केले असले तर अशा वेळी ते बांधकामे ही हार्डशिपमध्ये घेण्यात यावे. त्यामधून ही आपणास उत्पन्न वाढ घेण्यास मदत होईल. असे संपूर्ण बांधकाम आपण अनाधिकृत म्हणुन त्या संपूर्ण बांधकामाला आपण शास्ती लावतो. शास्ती त्याच्यावर पेन्डींगच राहणार आहे.

**प्राधिकृत अधिकारी** बांधकाम परवानगी ही आपणास नियमामध्ये राहुन दयावी लागते. एफएसआय पेक्षा जास्तीचे बांधकाम केले असेल तर त्यांला बांधकाम शास्ती लागणार आहे.

**उमेश चव्हाण** आम्हाला आताच माहीती मिळाली की महाराष्ट्र शासनाने स्थानिक संस्था कराची अभय योजना ही एका वर्षासाठी मुदत वाढ केली आहे. याचा आपण प्रचार करावे त्याची जाहीरात करावी. लोकापर्यत हा विषय घेवून जावा म्हणजे आपले उत्पन्नात वाढ होईल. नळ जोडणीची सर्व प्रक्रिया ही मुख्य कार्यालयातुन झाली पाहीजे.कारण आपल्याकडे नळ जोडणीचे रेकॉर्ड नाही. आपला मालमत्ता सव्वा लाख आहेत. नळ कनेक्शन केवळ 60 हजार आहेत. बीएसयुपीच्या घरांना देखील नळ जोडणी देण्यात यावी. यामधुनही आपला रेव्हीनिव्हमध्ये वाढ करुन घेण्यात यावे. या मधून आपल्याला दोन कोटीचे उत्पन्न होईल. डॉक्टराची भरती करण्यासाठी नव्याने जाहीरात देवून भरती करावी. भरती करताना शुगर तज्ञ,एम डी राहीले पाहिजे. याची ओपीडी तीन तास चालते. तर त्यांचे कडून आपण 8 तास काम करुन घ्यावे. यामुळे शहरातील नागरीकांना याची सोय होईल. आता तरी आपण जावून चेक केले तर कोणीही भेटणार नाही. एमडी मेडीसीन राहीले पाहीजे.सर्व कर्मचारी काढून टाकले पाहीजे.नवे कर्मचारी याची भरती केली पाहीजे.नव्याने अर्ज मागवून भरती करावी.

**प्राधिकृत अधिकारी** असे जर केल्यास मनपा विरुध्द स.न्यायालयात केसेस जातील. आपल्या तर गरज आहे.

**तुलजेस यादव** जे गरजेचे आहे. त्यांना ठेवणसयात यावे 40 हजार मानधात वाढ केली आहे. त्यांचेकडून आपण काम कमी करुन घेतो. ज्यांची आवश्यकता नाही त्यांना काढून टाकावे.

**उमेश चव्हाण** सिव्हील हॉस्पीटलमधील डॉक्टरांना 25 हजार मानधन आहे. आणि त्यांचे आठ तास सेवा घेण्यात येतात. आपल्याकडे तसे होत नाही. आपले डॉक्टर किती आहेत याचा खुलासा करण्यात यावा.

**वैदयकीय आरोग्य अधिकारी** आपल्याकडे 15 दवाखाने आहेत. आणि 24 डॉक्टर कार्यरत आहेत.

**उमेश चव्हाण** डॉक्टरांचे मानधन कमी करुन टाकावे.

**अनुजा तेहरा** डॉक्टर सोबतच इंजीनिअरचे मानधनात वाढ करावी.

**उमेश चव्हाण** सर्व अंर्थसंल्पाचे अधिकार हे मा. सभापती महोदयांना देण्यात यावे.

**तुलजेस यादव** सर्व अधिकार हे मा. सभापती महोदयांना देण्यात यावे काही सुचना असल्यास त्या सुचना सभापती यांचे कडे देण्यात यावे.

| | |
|---|---|
| **जयश्री जाधव** | तय बाजारी अंतर्गत सन 2014-15 ला मनपाला रुपये 55 लक्ष महसुल जमा झाला होता. त्यानंतर मनपाने आपल्या कर्मचा-याकडून वसुली करणे चालू केले पण सन 2015-16 व सन 2016-17 या दोन वर्षात रुपये 40 लक्ष सुध्दा वसुली झाली नसल्यानमुळे सन 2017-18 या वर्षात या बाबत ठोस निर्णय घेवून तयर बाजीरीचे काम मागील 10 ते 12 वर्षापासुन ज्या एजन्सीने चांगल्या प्रकारे काम केलेले आहे त्यांची नियुक्ती करुन मनपाचे महसुल वर्षाकाठी रुपये 70 लक्ष हाईल याकडे लक्ष घालावे. |
| **प्राधिकृत अधिकारी** | आपण तय बाजारीची निविदा काढली होती परंतू तय बाजारी मध्ये सबमिशन कोणीही केले नाही. त्यामुळे पुन्हा पुन्हा प्रसिध्द केल्या आहेत. प्रतिसाद मिळत नाही. |
| **तुलजेस यादव** | तय बाजारीमध्ये आपण डीमान्ड खुप ठेवली आहे. ती डिमांड कमी करण्यात यावी तर ही निविदा कोणीतरी खरेदी करणेसाठी समोर येतील. |
| **उमेश चव्हाण** | मागील वेळा आपण तिन महीण्यातचे निविदा काढल्या होत्या. मात्र पुर्ण होण्यापुर्वी एका वर्षाचे टेन्डर काढावे टेन्डर काढण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे. |
| **मालमत्ता व्यवस्थापक** | चार महीण्यासाठी 56 लक्षाचे टेन्डर काढले होते. एका वर्षासाठी एक कोटी 10 लक्ष रक्कम ठेवण्यात आली . |
| **जयश्री जाधव** | मनपाने सन 2012 मध्ये शहरात युझर चार्जेस नांवाने दवाखानाने हॉटेल व्यवसायीकांइून युझर चार्जेसच्या रुपाने ए टु झेडच्या माध्यमातून महसूल गाळा करण्यात आदेशीत केले होते. पण एटुझेड कडून या कामाकरीता सहकार्य न झाल्यामुळे मनपाकेच्या एस.आय. कडून ही सर्व वसुल करण्याचे ठरविले त्यांच्याही या महत्वाच्या कामाकडे पुर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येते. म्हणून या युझर चार्जेसचा अर्थसंकल्पामध्ये समाविष्ठ करुन मनपाने महसूल वाढेल याकडे लक्ष दयावे. |
| **प्राधिकृत अधिकारी** | आपण टॅक्स सोबत वसुल केले तर ही युझर चार्जेसची वसुली होवू शकते. ही करण्याची जबाबदारी आपण एटुझेड वर टाकण्यात आली होती यासाठी मनपाने कर्मचारी यांची नियुक्ती केली नव्हती.वर्षभरात आपला 6 कोटी रुपाचे उत्पन्न यामधून अपेक्षीत आहे आता पर्यत एटुझेने अंदाजे 10 लक्ष रुपये वसुल केले असतील. |
| **जयश्री जाधव** | एटुझेड कडून काम काढून घ्यावे. एटुझेड कडून काम काढून घेण्यात यावे. ते प्रभाग निहाय काम करुन घ्यावे. |
| **प्राधिकृत अधिकारी** | कचरा उचलने, ट्रान्सपोर्ट करणे आणि प्रक्रिया करणे यासाठी यासाठी निविदा मागवित आहोत चार वेळा आपण निविदा मागणी केली आहे. प्रोसिंग प्रक्रिया करण्यासाइभ एकच कंत्राटदार असला पाहीजे त्यामुळे आपला त्यामध्ये फायदा आहे मनपाचे हीत राहील तो प्रोसिंग प्लॉट कार्यान्वीत करु शकेल नाहीतर त्याची जबाबदारी नसेल तर तो काम करणे बंद करेल दैनदिन साफसफाई आपली निट राहील तो काम सोडून जाणार नाही. |
| **तुलजेस यादव** | दि.27.3.2017 ला आपले कंत्राटदार एटुझेड सोब कमी होणार आहे त्यावर आपण आणि त्यांनीकाम बंद केले तर काय उपयोग हाईल हे सांगावे. |
| **प्राधिकृत अधिकारी** | दि.27.03.2017 ला एटुझेडने काम बंद केले तर आपण 100 टॅक्टर, लेबर घेण्यासाठी झोनलला अधिकार दिले जाणार आहे. मनपाचे काही लेबर आहेत 500 ते 550 हे होतील आणि बाहेरचे कर्मचारी हे असे एकुण 750 ते 800 लेबर आपणास शहराच्या सफाईसाठी पुरे होतील या पध्दतीचे आपण नियोजन केलेले आहे. पुर्ण तयारी मनपाने केलेली आहे.एटुझेड आजही निघून गेले तरी आपणास अडचन येणार नाही याची आपण काळजी घेतली आहे. |
| **उमेश चव्हाण** | मनपाकेच्या सालसन 2015-16 चे सुधारीत व सालसन 2017-18 चे मुळ अंदाजपत्रकात दुरुस्ती व फेरफार करण्याचे संपुर्ण अधिकारी सभापती यांना देण्यात येते. |
| **तेहरा अनुजा** | श्री उमेश चव्हाण यांनी सालसन 2015-16 चे सुधारीत व सालसन 2017-18 चे मुळ अंदाजपत्रकात दुरुस्ती व फेरफार करण्याचे संपुर्ण अधिकार सभापती यांना अधिकार देण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. |
| **सभापती** | तसेच सन **२०१५-२०१६** चे सुधारीत अंदाजपत्रकात ठरावात दर्शविण्यात आल्याप्रमाणे खर्च बाजूस सुधारणा करुन उर्वरीत अर्थसंकल्प जसेच्या तसे मंजुर करण्यासाठी महासभेस शिफारस करण्यात येते सन स्थायी समिती सदस्यांच्या सुचने प्रमाणे वार्ड विकास निधी अंतर्गत स.सदस्यांच्या शिफारशीनूसार त्यांचे प्रभागात प्रत्येकी ४०-४० लक्षाची कामे करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात येत आहे. आयुक्तांनी केलेल्या शिफारशीनूसार केंद्रीय विद्यालयाचे धर्तीवर मनपाची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे, विविध बाबीकरीता भुसंपादन करणे ई. बाबीकरीता अंदाजपत्रकात तरतूद |

करण्यात येत आहे. स. सदस्यांनी मूळ अर्थसंकल्पास ज्याबाबीकरीता तरतूद करण्याची शिफारस केली आहे त्याप्रमाणे सन २०१७-२०१८ चे मूळ अर्थसंकल्पात ठराव क्र. १४५ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे तरतूदी करण्यासाठी व आयुक्तांचे उर्वरीत अर्थसंकल्पास व त्यातील प्रस्तावास मान्यता देण्यासाठी महासभेस शिफारस करण्यात येते, हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्र. १४५** **ठराव**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगपालिका नांदेड यांनी स्थायी समिती समोर सादर केलेल्या सालसन **२०१६-२०१७** चे सुधारीत अर्थसंकल्पात खर्च बाजुस खालील प्रमाणे दुरुस्ती करुन उर्वरीत अर्थसंकल्प जसेच्या तसे मंजुर करुन त्यास मान्यता देण्यासाठी हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करते. तसेच आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले सालसन **२०१७-२०१८** चे मूळ अर्थसंकल्पात खालील दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध शिर्षकात दुरुस्ती व फेरफार सुचवून उर्वरीत अंर्थसंकल्पास तसेच अर्थसंकल्पात आयुक्तांनी केलेल्या प्रस्तावसह जसेच्या तसे मंजुर करण्यासाठी ही स्थायी समितीची सभा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करते.

**सालसन २०१६-१७ चे सुधारीत अंर्थसंकल्पचे जमा बाजु**

| अ. क्र. | लेखा शिर्ष | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १ | सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीनुसार हॉर्डशिप प्रिमियम तसेच कंम्पाउडींग फिस | ५,००,००,०००/- | ८,००,००,०००/- |
| २ | नाहरकत प्रमाणपत्र, आर्कीटेक्ट लायसेंस, छाननी फिस, अनामत रक्कम, बांधकाम LBT, पाण्यासाठी पुर्नभरण अनामत | १,२०,००,०००/- | ३,५४,००,०००/- |

**सालसन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक**

| अ. क्र. | लेखा शिर्षक | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १ | मागील वर्षातील प्रलंबित देयके अदाई करणे साठी (सार्वजनिक बांधकाम विभाग स्पिलवर्क) | ८,००,००,०००/- | २०,००,००,०००/- |
| २ | मा. महापौर भत्ता, मा. उपमहापौर, मा. सभापती (स्थायी समिती), मा. सभागृह नेता, मा. विरोधीपक्ष नेता, मा. सभापती व मा. उप सभापती (शिमवबाकस) अतिथी भत्ता, अधिकारी व पदाधिकारी यांचेकडे येणा-या अभ्यंगतांसाठी चहा-पाणी भत्ता | ५,००,०००/- | १०,००,०००/- |
| ३ | मुख्य रस्त्याच्या मध्यभागी विद्युत खांब बसविणे, नवीन खंब बसविणे Electrical Pole Shifting | २०,००,०००/- | ३०,००,०००/- |
| ४ | मनपा इमारतीसाठी विधुत देखभाल दुरुस्ती करणे, सोलार दिवे, पथदिवे व विद्युत साहित्य खरेदी. | ८,५०,००,०००/- | १,५०,००,०००/- |
| ५ | इमारत दुरुस्ती | ५०,००,०००/- | ७०,००,०००/- |
| ६ | महापौर निवास भाडे व इतर इमारती भाडे | ५,००,०००/- | ७,००,०००/- |

**सालसन २०१७-१८ चे मुळ अंर्थसंकल्पचे जमा बाजु**

| अ. क्र. | लेखा शिर्ष | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १ | LBT मधुन तुटडा झालेल्या रक्कमा बाबत सहाय्यक अनुदान | ५५,००,००,०००/- | ७८,००,००,०००/- |
| २ | १४व्या वित्त आयोग अनुदान | ४०,००,००,०००/- | ६०,००,००,०००/- |
| ३ | शासनाचे विशेष अनुदान | ०० | १५,००,००,०००/- |
| ४ | BOT & BFT मनपाच्या सर्व मंगल कार्यालय/ सांस्कृतीक सभागृहाचे खाजगीकरण तत्वावर शॉपिंग कॉम्पलेक्स व मंगल कार्यालय बांधणे, बंजारा हॉस्टेलच्या जागेवर शॉपिंग व मंगल कार्यालय बांधकाम करणे, रंजितसिंघ मार्केट, राजीव गांधी मार्केट, आयुर्वेदिक दवाखाण्याजवळील मार्केट व इतर मार्केट बांधकाम करणे | ६,००,००,०००/- | १५,००,००,०००/- |
| ५ | व्यवसाय परवाना सक्तीचा करणे व नुतनीकरण करणे | २,००,००,०००/- | १३,००,००,०००/- |
| ६ | सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीनुसार हॉर्डशिप प्रिमियम तसेच कंम्पाउडींग फिस | ८,००,००,०००/- | १७,००,००,०००/- |
| ७ | नाहरकत प्रमाणपत्र, आर्कीटेक्ट लायसेंस, छाननी फिस, अनामत रक्कम, बांधकाम LBT, पाण्यासाठी पुर्नभरण अनामत | ३,००,००,०००/- | ५,७५,००,०००/- |

**<u>सालसन २०१७-१८ चे मुळ अर्थसंकल्पाची – खर्च बाजू</u>**

| अ. क्र. | लेखा शिर्षक | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १ | शहरातील विविध भागातील हिंदु स्मशानभुमी दफनभुमीचा विकास/ भुसंपादन करणे, तसेच शहरातील विविध भागातील मुस्लीम कब्रस्तानचा विकास करणे भुसंपादन करणे तसेच गेट क्र. 1,2, व 3 येथील विकास कामांच्या भुसंपादनाकरीता - **5 कोटी**.<br>1) चैतन्य नगर कब्रस्तान आवार भिंत घेणे. – **50 लक्ष**<br>2) बडीदर्गा कब्रस्तान आवर भिंत बांधकाम करणे – **50 लक्ष**<br>3) प्र.क्र. 55 मध्ये कब्रस्तान बांधकाम करणे – **50 लक्ष**<br>4) प्र.क्र.29 नई आबादी येथील स्मशानभुमीस संरक्षण भिंत बांधणे – **50 लक्ष**<br>5) प्र.क्र.3 सांगवी भागात स्मशानभूमी शेड तयार करुन संरक्षण भिंत बांधणे–**50 लक्ष** | १,००,००,०००/- | ७,५०,००,०००/- |
| २ | राष्ट्रपुरुषांची पुतळे देखभाल, सावित्रीबाई फुले-महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहु महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रतापसिंह व हरीत क्रांती जनक कै. वसंतराव नाईक यांचे पुतळे उभारणे, तसेच तथागत भगवान गौतम बुध्दांची पुर्णाकृती मुर्ती बसविणे व इतर पुतळे उभारणी. (महाराष्ट्र शासनाच्या निधीतुन तरतुद न झाल्यास मनपा निधीतुन) | २,००,००,०००/- | ४,००,००,०००/- |
| ३ | ट्रक टर्मिनल्स उभारणेकरीता भुसंपादन करणे. | ५०,००,०००/- | १,००,००,०००/- |
| ४ | स. सदस्यांच्या शिफारशींसह भांडवली जमा मधून प्रत्येक प्रभागात विकासकामे करणे 80 लक्ष तसेच प्रभाग क्र.7 मध्ये 1 कोटी 20 लक्ष | ०० | ३४,४०,००,०००/- |
| ५ | केंद्रीय विद्यालयाच्या धर्तीवर मनपाची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे (भुसंपादन व इमारत बांधकाम करणे) | २५,००,०००/- | १,००,००,०००/- |
| ६ | सखल भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ७ | गुरुद्वारा लंगर साहिबच्या वतीने नांदेड शहरात करण्यात येत असलेले वृक्षाचे जतन व संरक्षण करण्यासाठी वृक्षाला नियमित पाणी देणे व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी. | ०० | ५०,००,०००/- |
| ८ | लातूर रोड डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करणे | ३,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ९ | शहरातील मनपा मालकीच्या भूखंडावर महसुल वाढीसाठी व्यावसायिक बांधकाम करणे व उर्वरीत जागेत खेळाचे बांधकाम करणे. | ०० | २,००,००,०००/- |
| १० | सिडको येथील डॉ. शंकरराव चव्हाण अभ्यासिकेत फर्निचर व पुस्तके खरेदी करणे. | ०० | २५,००,०००/- |
| ११ | मनपा क्षेत्रिय कार्यालये अ,ब,क,ड अंतर्गत भाजीपाला मार्केट उभारणे | ०० | ४,००,००,०००/- |
| १२ | मनपा क्षेत्रिय कार्यालये अ,ब,क,ड अंतर्गत मटन मार्केट उभारणे. | ०० | ४,००,००,०००/- |
| १३ | मनपाकेच्या ट्रेचिंग ग्राउंड येथे विकास आराखडयात दर्शविल्याप्रमाणे सपाटीकरण करुन उद्यान विकसित करणे. | १,००,०००/- | १,५०,००,०००/- |
| १४ | अबचलनगर भागात मलनिःस्सारण लाईन टाकणे. | ०० | १,००,००,०००/- |
| १५ | मागील वर्षातील प्रलंबित देयके अदाई करणे साठी (पाणीपुरवठा व मलनिःस्सारण स्पिलवर्क) | १,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| १६ | मागील वर्षातील प्रलंबित देयके अदाई करणे साठी (सार्वजनिक बांधकाम विभाग स्पिलवर्क) | ८,००,००,०००/- | ३०,००,००,०००/- |
| १७ | मा. महापौर भत्ता, मा. उपमहापौर, मा. सभापती (स्थायी समिती), मा. सभागृह नेता, मा. विरोधीपक्ष नेता, मा. सभापती व मा. उप सभापती (शिमवबाकस) अतिथी भत्ता, अधिकारी व पदाधिकारी यांचेकडे येणा-या अभ्यंगतांसाठी चहापाणी भत्ता. | ५,००,०००/- | १०,००,०००/- |
| १८ | महापुरुषांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करणे. | ५,००,०००/- | २५,००,०००/- |
| १९ | दुल्हेशाह रहेमान इदगाहचा विकास करणे. | ०० | ५०,००,०००/- |
| २० | संत बाबा जोगिंदर सिंघ उद्यानाचे काम करुन कंपाउंड वॉलचे बांधकाम करणे. | ०० | २४,००,०००/- |
| २१ | साईनगर भागात बाबा शेख फरीद दवाखान्याचे उर्वरीत विकासकामे करणे. | ०० | २४,००,०००/- |
| २२ | इदगाह मैदान येथे प्लॅटफार्म तयार करणे. | ०० | २५,००,०००/- |
| २३ | शिवनगर, नंदीग्राम सोसायटी येथे मलनिःस्सारण लाईनकरीता | ०० | ३३,००,०००/- |
| २४ | शहरातील गोरक्षण भागात मुख्य नाल्याचे बांधकाम करणेकरीता | ०० | ५०,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन | ५,००,०००/- | १५,००,०००/- |
| २६ | रमजान महिण्यात इफ्तार पार्टीच्या आयोजनाकरीता | १,५०,०००/- | २,००,०००/- |
| २७ | महानगरपालिका अर्थसंकल्पीय विशेष सभेकरीता उपस्थित सदस्यांना जेवण व अल्पोपहारासाठी | ०० | १,००,०००/- |
| २८ | शिवाजीनगर चौकात स्वातंत्र्यसेनानी आबासाहेब देशमुख लहानकर यांच्या स्मारकाचे सुशोभिकरण करणे. | ०० | १०,००,०००/- |
| २९ | प्रभाग क्र.39 येथील एन.डी.41 के - 1 भागातील दीक्षाभूमी विहाराची डागडूजी करणे तसेच सांस्कृतीक सभागृह उभारणे. | ०० | १०,००,०००/- |
| ३० | प्रभाग क्र.1 मध्ये एजाज भाई बेग यांचे घर ते लोंढे सर यांचे घरापासून ते गिरीराज यांच्या प्रोव्हिजन स्टोअर्स पर्यंत सी.सी. रस्ता करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ३१ | प्रभाग क्र.1 मध्ये देबडवार सावकार यांच्या घरापासून ते त्रिवेणी नगर रोड पाटीपर्यंत सी.सी. रस्ता करणे बाबत. | ०० | १०,००,०००/- |
| ३२ | प्रभाग क्र.1 मध्ये शिवसाई नगर पाटी ते पावक हनुमान मंदिरापासून ते कत्ते यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे बाबत. | ०० | १०,००,०००/- |
| ३३ | प्रभाग क्र.1 मध्ये ओंकारेश्वर नगर येथे अंतर्गत सी.सी. रस्ते करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ३४ | प्रभाग क्र.1 मध्ये गिरीराज प्रोव्हिजन स्टोअर्स पासून ते शेख सर यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ३५ | प्रभाग क्र.6 मध्ये पिरबु-हाणनगर भागातील गल्ली नं.10 आणि 23 मध्ये नवीन जलवाहिनी टाकणे. | ०० | १०,००,०००/- |
| ३६ | प्रभाग क्र.6 मध्ये पिरबु-हाणनगर भागातील गल्ली नं. 5,7,9 आणि 21 मध्ये मलनिःस्सारण वाहिनी टाकणे. | ०० | २५,००,०००/- |
| ३७ | प्रभाग क्र.12 मध्ये जवाहरनगर हाऊसिंग सोसायटी भागात श्री. आनंद भारती साहेब यांच्या घरापासुन श्री. नागनाथ कुंभार साहेब यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ३८ | प्रभाग क्र.12 मध्ये खोब्रागडे नगर नं.1 भागातील जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणी समाज मंदिराचे पुर्ण बांधकाम करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ३९ | प्रभाग क्र.12 मध्ये विनायक नगर भागातील श्री. मठपती यांच्या घरापसुन श्री. बेरुरकर यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ४० | प्रभाग क्र.24 मध्ये इस्लामपुरा ते ट्रेचींग ग्राउंड ते गाडे गांव रोड पर्यंत रस्ता बांधणे. | ०० | १,००,०००/- |
| ४१ | प्रभाग क्र.24 ट्रेचींग ग्राउंड ते असदुल्लाबाद लगत पांदन रस्ता ते गाडेगाव रोड पर्यंत रस्ता तयार करणे. | ०० | १,००,०००/- |
| ४२ | प्रभाग क्र.26 मध्ये हबिबीया कॉलनी व खुसरो नगर भागात अंतर्गत सिमेंट रस्ते करणे. | ०० | २४,००,०००/- |
| ४३ | प्रभाग क्र.28 मध्ये आलमखान यांच्या घरापासून ते गौस कंगारवाले यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. रोड व ड्रेनेज लाईन टाकणे. | ०० | १५,००,०००/- |
| ४४ | प्रभाग क्र.28 भंगार लेन मध्ये भारत विद्यालय शाळेपासून ते डॉ. आंबेडकर वाचनालय चौरस्ता पर्यंत आर.सी.सी. नाली टाकून स्लॅब टाकणे. | ०० | १०,००,०००/- |
| ४५ | प्रभाग क्र.29 मध्ये श्री शिवाजी भंडरवार यांच्या घरापासून श्री धोंडीबा कोकूलवार यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाली करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ४६ | प्रभाग क्र.29 मध्ये श्री प्रल्हाद दुधे यांच्या घरापासून राजू घुगे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाली करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ४७ | प्रभाग क्र.29 मध्ये श्री सुभाष पिंपरणे यांच्या घरापासून मनोहर नेमाडे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाली करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ४८ | प्रभाग क्र.29 मध्ये श्री बजरंग उपलंचवार यांच्या घरापासून प्रकाश बुरडे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाली करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ४९ | प्रभाग क्र.29 मध्ये श्री सुरेश भारसकर यांच्या घरापासून नगरवाडे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाली करणे. | ०० | १०,००,०००/- |
| ५० | प्रभाग क्र.31 मध्ये नूर पहेलवान यांच्या घरासमोरील पटांगणापासून लकडीचा घोडा मंदिर ते सालार भाई वांगीवाले पर्यंत नवीन ड्रेनेज लाईनचे बांधकाम करुन रोडचे बांधकाम करणे. | ०० | १०,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| **५१** | प्रभाग क्र. 31 मध्ये सराच्या मागच्या कब्रस्तानपासून होळी मेनरोड पर्यंत रोडचे बांधकाम करणे. | ०० | १०,००,०००/- |
| **५२** | प्रभाग क्र.31 मध्ये हातजोडी मंदिर हस्नैन मस्जिद रोड ते केराच्या महीच्या अखेर भाग पर्यंत, लगतच्या चार गल्ल्यासहित पिण्याच्या पाण्याच्या लाईन टाकणे बाबत. | ०० | १५,००,०००/- |
| **५३** | प्रभाग क्र.32 मध्ये मलनिःस्सारण लाईन टाकण्याकरीता | ०० | १०,००,०००/- |
| **५४** | प्रभाग क्र.32 मध्ये जलवाहिनी टाकणे व विंधन विहीर दुरुस्तीकरीता | ०० | ५,००,०००/- |
| **५५** | प्रभाग क्र.32 मध्ये सी.सी. व बी.टी. रस्ते करीता | ०० | २०,००,०००/- |
| **५६** | प्रभाग क्र.37 मध्ये कौठा येथे अभ्यासिका इमारतीचे बांधकाम करणे. | ०० | ५०,००,०००/- |
| **५७** | शारदानगर मुख्य रस्ता ते स्वातंत्र्य सैनिक कॉलनी सी.सी. रोड करणे. | ०० | १०,००,०००/- |
| **५८** | ताजनगर हाऊसिंग सोसायटीमध्ये पिण्याचे पाण्याची व ड्रेनेजची लाईन टाकणे. | ०० | १०,००,०००/- |
| **५९** | भोईगल्ली लक्ष्मीनगर नदीकाठा वरील रस्ता विकास | ०० | ५,००,०००/- |
| **६०** | महापालिका वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाकरिता. | ०० | २,००,०००/- |
| **६१** | मनपा सफाई कामगारांच्या आरोग्य सुरक्षेकरीता साठी साहित्य खरेदी | ०० | ३,००,०००/- |
| **६२** | प्रभाग क्र.15 मध्ये विविध विकासकामे करणे | ०० | ५०,००,०००/- |
| **६३** | महापौर भाडे व इतर इमारती भाडे | ५,००,०००/- | १०,००,०००/- |

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.